# अर्थ व प्रशासन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जाक./वे.व.ले./परिपत्रक/६१३/२०१९ दिनांक: १३/०३/२०१९

विषय:– आर्थिक वर्ष २०१९ अखेर मार्च महिन्यात विद्यापीठाअंतर्गत सर्व आंहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपूर यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना.

संदर्भ:– १)शासन परिपत्रक क्र. संकिर्ण–२०१९/प्र.क्र.३३/२०१९/कोषा प्रशा–५, दि. ०७/०३/२०१९.

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, मार्च अखेर नेहमी उद्‌भवणा–या अडचणींवर मात करण्यासाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली कार्यालये, सर्व आहरण व संवितरण अधिकारी तथा वेतन व लेखाधिकारी अकोला/नागपूर यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

दि. ३१ मार्च, २०१९ रोजी रविवार असल्याने शासकीय कार्यालयांना सुट्टी आहे. या अनुषंगाने वर्षाअखेर निधि अखर्चित राहू नये यासाठी वेतन व लेखाधिकारी अकोला/नागपूर कार्यालये दि. ३०.०३.२०१९ रोजी माहे मार्च अखेरची देयके स्विकारतील व भारतीय कृषि अनुसंधान परिषद (I.C.A.R.), सार्वजनिक वित व्यवस्थापण प्रणाली (P.F.M.S.) प्रदानाची कामे पुर्ण करतील. वेतन व लेखाधिकारी कार्यालय अकोला/नागपूर दि.३१/०३/२०१९ रोजी कोणतीही देयके स्विकारणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच दिनांक ३०/०३/२०१९ ही देयके पारीत करण्याची अंतिम तारीख राहील याचीही नोंद सर्व आंहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगरूंचे तांत्रिक सचिव मा. कुलगुरूं डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीस्तव सादर
२. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व)

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

**आर्थिक वर्ष २०१९ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा कार्यालय/ कोषागारे / उपकोषागारे यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र.- संकीर्ण -२०१९/प्र.क्र.३३/२०१९/कोषा प्रशा-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०७ मार्च, २०१९.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण २०१८/ प्र.क्र.५८/२०१८/कोषा प्रशा-५, दि.१४ मार्च, २०१८.
२) शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण २०१८/ प्र.क्र.६१/२०१८/कोषा प्रशा-५, दि. १४ मार्च, २०१८.

शासन परिपत्रक-

दरवर्षी मार्च महिन्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात पूरक मागणीद्वारे व सुधारीत अंदाजपत्रकाद्वारे विविध विभागांना निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदर उपलब्ध झालेला निधी ३१ मार्च अखेर कोषागार / उपकोषागार तसेच अधिदान व लेखा कार्यालय येथे देयके सादर करुन खर्च करणे अनिवार्य असल्यामुळे अधिदान व लेखा कार्यालय तसेच कोषागार / उपकोषागार कार्यालयात मार्च महिन्यात सादर होणा-या देयकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे ट्रेझरी नेट, बिम्स व सेवार्थ इ. प्रणालींवर ताण येऊन त्या खंडीत होण्याचे व वेग मंदावण्याचे प्रकार घडतात. तसेच देयकांची तपासणी करण्यास पुरेसा कालावधी मिळत नाही. याशिवाय उपकोषागार स्तरावर रात्री उशिरा सादर होणारी देयके, बँकेच्या कामाच्या वेळांमुळे पारित करता येत नाहीत. अशाप्रकारे माहे मार्च अखेर नेहमी उदभवणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभाग त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालये, आहरण व संवितरण अधिकारी तसेच अधिदान व लेखा कार्यालय/ सर्व कोषागारे / उपकोषागारे यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

**१) दि. ३० मार्च २०१९ रोजी अधिदान व लेखा कार्यालय तसेच कोषागार / उपकोषागार कार्यालयातील देयके स्वीकृती व प्रदानाचे काउंटर चालू ठेवणे :-**

दि. ३१ मार्च, २०१९ रोजी रविवार असल्याने शासकीय कार्यालयांना सुट्टी आहे. या अनुषंगाने वर्षाअखेर निधी अखर्चित राहू नये यासाठी अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालये व उपकोषागार कार्यालये दिनांक ३०.०३.२०१९ रोजी माहे मार्च अखेरची देयके स्विकारतील व ECS / NEFT / CMP प्रदानाची कामे पुर्ण करतील. **अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालये व उपकोषागार कार्यालये दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी कोणतीही देयके स्विकारणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच दिनांक ३० मार्च २०१९ ही बिम्स (BEAMS) व्दारे BDS काढण्यासाठीची अंतिम तारीख राहील याचीही नोंद सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी.**

२) **दि. ३० मार्च २०१९ रोजी शासकीय प्रदाने धनादेशाद्वारे करण्यास मंजूरी देणे :-**

दि. ३० मार्च २०१९ रोजी मुंबई व नागपूर येथील भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय स्टेट बँक तसेच शासनाचे आर्थिक व्यवहार हाताळणाऱ्या अन्य बँकांचे कामकाज उशिरापर्यंत चालू राहिले तरी रात्री १२.०० नंतर बँकांच्या संगणकीय प्रणालीतील दिनांकात बदल होत असल्याने, व्यवहार पुढील दिनांकास नोंदविला जातो. सबब शासकीय व्यवहारांचे अचूक लेखांकन होण्याकरीता **दि. ३० मार्च २०१९ रोजी सायंकाळी ६.०० वा. नंतर शासकीय प्रदाने धनादेशाद्वारे करण्यात यावीत.**

३) **कोषागाराकडून पूर्वीची आक्षेपीत देयके २० मार्च २०१९ पूर्वी कोषागारात / उपकोषागारात देयके सादर करणे :-**

दि. ०१ एप्रिल, २०१८ ते दि. २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत म्हणजेच दि. ०१ मार्च २०१९ पूर्वी कोषागारांनी आक्षेपित केलेली देयके वर्ष अखेरीस एकत्रित सादर केली जातात व देयकांची प्रचंड संख्या पहाता, त्यांची काटेकोर तपासणी करणे कोषागार अधिकाऱ्यांना वेळेअभावी शक्य होत नसल्याने, त्यात अनियमितता घडू शकते. त्यामुळे **कोषागारांकडून दि.०१ मार्च २०१९ पूर्वी आक्षेपित झालेली दीर्घ काळापासून कोषागारात पुन्हा सादर न केलेली सर्व देयके सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी दि. २० मार्च २०१९ पर्यंतच अधिदान व लेखा कार्यालय व कोषागारात / उपकोषागारात सादर करावी. त्यानंतर अशा प्रकारची देयके स्विकारली जाणार नाहीत. प्रशासकीय विभागांकडे सध्या उपलब्ध असलेल्या अनुदानाची खालील बाबींची देयके दि. २० मार्च २०१९ पर्यंत कोषागारात सादर करण्यात यावीत.**

अ) प्रवास भत्ता देयके.
ब) आस्थापना विषयक पुरवणी देयके.
क) वैद्यकीय खर्च प्रतीपूर्ती देयके.

**त्यानंतर अशी देयके पुढील वर्षाच्या अनुदानातून काढण्यात यावी.**

केवळ पुरवणी मागण्या ( मार्च-२०१९ ) व सुधारीत अंदाजपत्रकानुसार उपरोक्त बाबींसाठी मंजूर झालेल्या अनुदानाचीच देयके दि. २० मार्च २०१९ नंतर कोषागारात सादर करता येतील.

४) **प्रपत्र बिजक (Proforma Invoice ) जोडून सादर होणाऱ्या देयकांबाबत :-**

मार्च महिन्याच्या अखेरीस उपलब्ध निधी खर्च करण्याचे हेतूने माल/ वस्तु प्राप्त झालेल्या नसताना म.को.नि. नमुना ३१ अथवा २८ मध्ये प्रपत्र बिजक (Proforma Invoice ) जोडून देयके सादर केली जातात. याप्रकरणी शासन वित्त विभाग परिपत्रक दि. १४.०३.२०१८ अन्वये अधिदान व लेखा कार्यालय, कोषागार / उपकोषागार कार्यालयांनी काय कार्यवाही करावी याबाबतचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार आता म.को.नि. नियम १९६८ मधील नियम ३०२ व ३०३ व महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील परि.१ मधील विवरणपत्र २ मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठीच संक्षिप्त देयकांवर रक्कम काढण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) महाराष्ट्र कोषागार नियमातील नमुना २८ अथवा ३१ मध्ये प्रपत्र बिजक (Proforma Invoice ) जोडून देयके सादर केली असतील तर अशी देयके पारित करु नयेत.

ब) पुरवठादाराकडून खरेदी केलेल्या वस्तुंचा पुरवठा करण्यात आला असेल व म.को.नि. नमुना २८ अथवा ३१ सोबत अंतिम देयक (Final Bill )/ नियमित प्रमाणके/ पावत्या जोडल्या असतील तरच देयके पारित करावीत.

वरील अ) व ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१/ २०१९/ कोषा.प्रशा-५ दि. ३१/०१/२०१९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) **जिल्हा कोषागार स्तरावर सादर होणे आवश्यक असणारी देयके उपकोषागार स्तरावर सादर न करणे :-**

सुधारीत अंदाजपत्रक व पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदानातून वैयक्तीक लाभाची मोठ्या प्रमाणात देयके महसूल व वन विभाग, कृषी व प.दु.म.विभाग, आदिवासी विकास विभाग, इ. कडून तालूकास्तरावर अनुदान वाटप करुन उपकोषागार कार्यालयामध्ये वर्ष अखेरीस सादर केली जातात. **उपकोषागार स्तरावर एकच लिपीक व एकच उपलेखापाल / सहाय्यक लेखा अधिकारी असल्यामुळे अशा देयकांची छाननी करण्यावर मर्यादा येतात व अनियमितता घडण्याचा संभव असतो. त्यामुळे अशी देयके उपकोषागार कार्यालयात सादर न करता जिल्हा कोषागार कार्यालयांमध्येच सादर करण्यात यावीत.**

६) **उपकोषागारांमध्ये दि. ३० मार्च २०१९ रोजी सायंकाळी ०६.०० वा.नंतर देयके स्विकृती बंद करुन लेखे जिल्हा कोषागारात सादर करणे.**

उपकोषागार कार्यालयात प्राप्त होणारी देयके, त्या देयकांवर उपकोषागारांकडून करावयाच्या कार्यवाहीस लागणारा अवधी व बँकेच्या कामाचा कालावधी पहाता उपकोषागारात दि. ३० मार्च २०१९ रोजी सायंकाळी ०६.०० वा.नंतर देयके स्विकृती बंद करण्यात यावी. **दि. ३० मार्च २०१९ रोजी सायंकाळी ०६.०० वा.नंतर कोकण भवन, उपकोषागार कार्यालय वगळून इतर उपकोषागार स्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी यांचे देयकाबाबतीत त्यांनी त्यांचे जिल्हा स्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी यांचे मार्फत जिल्हा कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी.**

७) **अर्थसंकल्पीय प्रणालीतून दि. ३० मार्च २०१९ रोजी उणे प्राधिकार पत्राची सुविधा बंद करणे :-**

शासनाच्या आर्थिक व्यवहारात विलंब टाळण्याच्या दृष्टीने ठराविक प्रकारच्या उद्दीष्टांवर खर्च करण्याकरिता अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीतून उणे प्राधिकार पत्र निर्गमित करण्याची मुभा प्रणालीत ठेवण्यात आलेली आहे. मंजूर अनुदानापेक्षा जास्तीचा खर्च होवून अर्थसंकल्पीय अनियमितता घडण्याची शक्यता विचारात घेता, आठमाही सुधारित अंदाजपत्रकानुसार निधी

प्राप्त झाल्यानंतर अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीमधुन उणे प्राधिकार पत्र निर्गमित होण्याची सुविधा बंद करण्यात येईल.

८) नियंत्रक अधिकाऱ्यांनी पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान त्वरीत बिम्स (BEAMS) प्रणालीवर उपलब्ध करुन देणे :-

शासनाकडून विविध विभागांना आठमाही सुधारीत अंदाजपत्रकानुसार तसेच पुरवणी मागण्यांद्वारे अनुदान मंजूर केल्यानंतर प्रशासनिक विभाग व विभाग प्रमुखांकडून बिम्स (BEAMS) प्रणालीवर उशिराने आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. सबब त्यानंतर देयके तयार करणे, उपकोषागारात सादर करणे इत्यादी कार्यवाही करण्यास विलंब होतो. त्यामुळे दि. ३० मार्च रोजी बिम्स (BEAMS) प्रणाली तसेच ट्रेझरी नेट प्रणाली यावर प्रचंड ताण येवून या प्रणाली बंद पडतात अथवा खंडीत होतात. त्याकरीता सर्व विभागांनी / नियंत्रण अधिकाऱ्यांनी सुधारित अर्थसंकल्पाद्वारे तसेच पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान बिम्स (BEAMS) प्रणालीवर त्वरीत उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१९०३०७१४४३४३६००५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2019.03.07 14:48:51 +05'30'

(इंद्रजित गोरे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२.सर्व सन्मानिय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य,
३.राज्यपालांचे सचिव
४.मुख्यमंत्र्यांचे सचिव
५.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
७.मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
८.प्रबंधक, मुळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई

११.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२

१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१

१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई

१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

१७.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई

१८.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१९.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई

२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२१.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली

२२.सर्व विभागीय आयुक्त

२३.सर्व जिल्हाधिकारी

२४.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२५.संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई

२६.अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई

२७.सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती

२८.मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई

२९.सहसंचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई /पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती

३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने

३१.निवड नस्ती कोषा प्रशा-५.